# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/10/2023 (मंगळवार) सकाळ

## अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा यांची कारवाई

दि. ०९/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारां कडुन माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत जयभोले नगर वार्ड क्र. ०५ चनकापुर परीसरात राहणारा अजय गुप्ता नावाचा इसम हा स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता आपले राहते घरी आपली आई चंदा हिच्या सोबत बाहेरून स्त्रिया बोलावून त्यांना आपले घरी गिऱ्हाईक व जागा उपलब्ध करून अवैध वेश्या व्यवसाय चालवीत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन घटनास्थळावर रेड कारवाई करून वेश्याव्यवसाय चालविणारे घर मालक फरार चंदा हनुमानप्रसाद गुप्ता, वय ६५ वर्ष, सर्व रा. चनकापुर खापरखेडा हिचा मुलगा १) अजय हनुमानप्रसाद गुप्ता, वय ४२ वर्ष हा २) राहुल तीलकचंद गुप्ता, वय २२ वर्ष व ०२ महिला यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींना त्यांची मेडिकल तपासणी करून जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले असून त्यांचे विरूद्ध कलम ३, ४, ५ महिला अनैतीक व्यापार प्रतिबंधक कायदा सन १९६५ अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे खापरखेडा करीत आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, ईकबाल शेख, प्रमोद भोयर, महिला पोलीस हवालदार नीतू खोब्रागडे, कवीता बचले, पोलीस नायक विरु नरड, चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.

## सराईत गुन्हेगार पवन नरेश नेवारे याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द
## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत येणाऱ्या पिपळा डाक बंगला परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार पवन नरेश नेवारे, वय २३ वर्ष रा. पिपळा डाक बंगला याने पोलीस स्टेशन खापरखेडा परीसरात मोठया प्रमाणात गुन्हे करून गुन्हेगारी मध्ये निरंतर सक्रीय होता. त्याचे या गून्हेगारी कृत्यामुळे नागरीकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. सदर सऱ्हाईत अपराधी हा शरीराविरूध्द व मालमत्ते संबंधात गुन्हे करण्यात अग्रेसर असल्याने त्याचे या कृत्यामुळे सामान्य जनतेच्या जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. अश्या या धोकादायक गून्हेगाराविरूध्द नागपुर ग्रामीण पोलीसांनी बरेच वेळा प्रतिबंधक कारवाई केलेली आहे. तसेच त्यांचेविरूध्द दाखल करण्यात आलेल्या गून्हयात त्याला वारंवार अटक सुध्दा करण्यात आली. व त्याचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी या हेतुने त्याला कारागृहात ही पाठविण्यात आले. परंतु कारागृहातुन सुटका झाल्यानंतर त्याचे मध्ये कोणतीही सुधारणा झाली नाही. याउलट तो अधिक निडर व दु:साही होत गेला. त्याने साथीदारासह दुखापत पोहचवुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची देणे, साथीदारासह दरोडा, अवैध हत्यार बाळगणे यासारखे गुन्हे करत गेला. त्यामुळे परीसरात राहणाऱ्या नागरीकांमध्ये त्याची प्रचंड दहशत निर्माण झाली. यामुळें त्याचेवर नियंत्रण ठेवुन त्याचेवर प्रभावी कारवाई करणेकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस

अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी ठाणेदाराला कठोर व प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पोस्टे खापरखेडाचे ठाणेदार यांनी सदर गुन्हेगाराविरूध्द एमपीडिए कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करून मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना सादर केला. मा. जिल्हाधिकारी यांनी सदर स—हाईत गुन्हेगाराची वृत्ती व त्याने केलेले गुन्हे तसेच त्यांने खापरखेडा परीसरात माजविलेली दहशत लक्षात घेता सदर गुन्हेगारा विरूध्द योग्य ती दखल घेवुन त्यास ०१ वर्षाकरीता स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने स—हाईत गुन्हेगार पवन नरेश नेवारे यास दिनांक १०/१०/२०२३ रोजी मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, श्री. हर्ष ए पोद्दार, व अपर पोलीस अधीक्षक, डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक अनिल राऊत तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सुरज परमार, निलेश बर्वे, होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

## सराईत गुन्हेगार गोपीचंद फकरू मांढरे याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत येणाऱ्या गंगापूर परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार गोपीचंद फकरू मांढरे, वय ४८ वर्ष, रा. गंगापूर पोस्टे उमरेड हा मागील ४ ते ५ वर्षापासून उमरेड परिसरात गुंडगिरी करुन नागरिकांना त्रास देत होता. तो नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेला असायचा उमरेड परिसरात मोहाफुलाची हातभट्टीने दारू काढुन विक्री करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले. परंतु गोपीचंद याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु गोपीचंद याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. गोपीचंद याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. ०९/१०/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सराईत गुन्हेगार गोपीचंद फकरू मांढरे याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला त्यानुसार त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, श्री. हर्ष ए पोद्दार, व अपर पोलीस अधीक्षक, डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन उमरेड येथील ठाणेदार प्रमोद घोंगे तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सुरज परमार, निलेश बर्वे, होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**